# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)
मुख्य कार्यालय : चौथा मजला, काकडे बीझ आयकॉन,
ई-स्क्वेअर जवळ, पुणे विद्यापीठ रोड, अशोक नगर,
शिवाजी नगर, पुणे - ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : (का.) : ०२०-२५५७७९९९, २५५७७९००
ई-मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in

झो. पु. प्रा
निश्चयेन परिवर्तनम्।
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
पुणे व पिंपरी चिंचवड

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

४२६
२८/०७/२०२३

जा.क्र.झोपुप्रा/तां.३/टीडीआर/मा.क्र. ११३/१३८३/२०२३
दिनांक :- २८/०७/२०२३.

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

## अंशत: भोगवटा प्रमाणपत्र

वाचा - १) मूळ बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/६५९/२०१८ दि. १७/०४/२०१८.

२) दुरूस्त बांधकाम परवानगी जा.क्र. झोपुप्रा/तां.१/मा. क्र.११३/५८२/२०२२ दि.०५/०५/२०२२.

३) वास्तुविशारद यांचे अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मिळणेबाबतचा विनंती अर्ज. (आ.क्र ५८६ दि.२८/०६/२०२३.)

४) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दि.२६/०७/२०२३ रोजीची मान्य टिपणी.

---

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९, कलमे २५३/२५४ व महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ कलम ४५ प्रमाणे मौजे पिंपरी वाघिरे, स.नं. २३३ (पै), गणेशनगर, पुणे येथिल झोपडपट्टी पुनर्वसन योजनेमधील (पुनर्वसन) इमारतीस या कार्यालयाकडून क्रमांक झोपुप्रा/६५९/२०१८ दि. १७/०४/२०१८ अन्वये मुळ बांधकाम परवानगी व झोपुप्रा/तां.१/मा. क्र.११३/५८२/२०२२ दि.०५/०५/२०२२ नुसार दुरूस्त बांधकाम परवानगी देणेत आली आहे. बांधकाम परवानगी प्रमाणे इमारतीचे काम पूर्ण झाल्याने, सदर इमारतीमधील सदनिका साठी भोगवटा पत्र मिळण्याबाबत वास्तुविशारद श्री. राहुल माळवदकर यांनी उपरोक्त वाचा मध्ये नमूद केले नुसार विनंती अर्ज केलेवरुन खालीलप्रमाणे तपशीलानुसार पुनर्वसन इमारतीस अंशत: भोगवटा प्रमाणपत्र मा.मु.का.अ. यांचेकडील मान्यतेनुसार देणेत येत आहे.

| अ.क्र. | मजले | नकाशा मंजूरीनुसार | | एकूण सदनिका / दुकाने |
|---|---|---|---|---|
| | | पुनर्वसन घटक | | |
| | | resi | comm | |
| १) | ग्राउंड | ०१ वेलफेअर सेंटर + ०१ पंप रूम + ०१ पंप रूम | Shops-- ०१-०२ | ०२ शॉप्स + ०१ वेलफेअर सेंटर + ०१ पंप रूम |
| २) | पहिला | पार्किंग | | |
| ३) | दुसरा | पार्किंग | | |
| ४) | तिसरा | पार्किंग | | |
| ५) | चौथा | सदनिका - ४०२ ते ४०६ व ४०८ ते ४१० ०२ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर + ०१ सोसायटी ऑफिस + ०१ स्कुटर लिफ्ट मशीन रूम | -- | ०८ सदनिका + ०२ बालवाडी + ०१ वेलफेअर सेंटर + ०१ सोसायटी ऑफिस + ०१ स्कुटर लिफ्ट मशीन रूम |
| ६) | पाचवा | सदनिका ५०१ ते ५१२ | -- | १२ सदनिका |
| ७) | सहावा | सदनिका ६०१ ते ६१२ | -- | १२ सदनिका |
| ८) | सातवा | सदनिका ७०१ ते ७१२ | -- | १२ सदनिका |
| ९) | आठवा | सदनिका ८०१ ते ८१० + Refuge area | -- | १० सदनिका + Refuge area |
| १०) | नववा | सदनिका ९०१ ते ९१२ | -- | १२ सदनिका |
| ११) | दहावा | सदनिका १००१ ते १०१२ | -- | १२ सदनिका |
| १२) | अकरावा | सदनिका ११०१ ते १११२ | -- | १२ सदनिका |
| १३) | बारावा | सदनिका १२०१ ते १२१२ | -- | १२ सदनिका |
| १४) | तेरावा | सदनिका १३०१ ते १३१०+ Refuge area | -- | १० सदनिका + Refuge area |
| १५) | चौदावा | सदनिका १४०१ ते १४१२ | -- | १२ सदनिका |
| १६) | पंधरावा | सदनिका १५०१ ते १५१२ | -- | १२ सदनिका |
| १७) | सोळावा | सदनिका १६०१ ते १०१२ | -- | १२ सदनिका |
| १८) | सतरावा | सदनिका | -- | १० सदनिका + Refuge area |

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune Pimpri-Chinchwad Area

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १७०१ ते १७१० + Refuge area | | |
| १९) | अठरावा | सदनिका<br>१८०१ ते १८१२ | -- | १२ सदनिका |
| २०) | | एकूण | | १७० सदनिका + ०२ दुकाने + ०१ पंप रूम + ०२ बालवाडी + ०२ वेलफेअर सेंटर + ०१ सोसायटी ऑफिस + ०१ स्कुटर लिफ्ट मशीन रूम. |

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

अटी :-

१) प्रस्तुत बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त झालेनंतर सदर इमारतीमध्ये वा भूखंडामध्ये केलेले कोणतेही बांधकाम अनाधिकृत समजण्यात येईल आणि त्या बाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६चे कलम ५२ ते ५६ नुसार जरूर ती कार्यवाही करण्यात येईल.

२) बांधकाम भोगवटा प्रमाणपत्रासाठी सादर केलेली कागदपत्रे चुकीची अथवा दिशाभूल करणारी असल्याचे भविष्यात कोणत्याही वेळेस आढळल्यास दिलेले बांधकाम भोगवटा प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

३) प्रकरणी भविष्यात कोणतीही शासकीय देणी / येणे देय असल्याबाबत आढळून आल्यास अगर विविध देय शुल्कांच्या परिगणनेमध्ये तफावत आढळून आल्यास त्याप्रमाणे फरकाची रक्कम भरणे विकसकावर बंधनकारक राहील.

४) स्थानिक संस्था कराबाबत व उपकराबाबत शासन धोरण व नियमानुसार आवश्यक ती पूर्तता करणे व सर्व अटी / शर्तींचे पालन करणे विकसकांवर बंधनकारक राहील.

५) विषयांकित योजना रस्तारूंदीकरणाखालील / आरक्षणाखालील क्षेत्र म.न.पा. पुणे यांचेकडे हस्तांतरीत करून तसे, उर्वरित टी.डी.आर. मागणीपूर्वी, या कार्यालयास अवगत करावे.

६) इमारतीचे सर्व सिमाभिंतीचे काम सदर योजनेचा अंतिम भोगवटा प्रमाणपत्र मागणीपूर्वी पूर्ण करून सामासिक अंतराचे संपूर्ण क्षेत्र खुले ठेवणे बंधनकारक आहे.

७) सदर झोपडपट्टी योजनेतील पुनर्वसन सदनिकांचे वाटप, भोगवटापत्र प्राप्त झाल्यापासून १५ दिवसांमध्ये सोडतपद्धतीने वितरीत करून घेणे आवश्यक आहे.

८) सदर योजनेसाठी लागू होणारे शुल्क, जसे देखभाल खर्च, आणि पायाभूत सुविधा शुल्काची एकूण रक्कम (१००% रक्कम) टी.डी.आर. मागणीपूर्वी अदा करणे आवश्यक आहे.

९) अतिरिक्त (विक्री घटक) क्षेत्राबाबतचा मोबदला विकसक यांनी त्यांचे जबाबदारी व तसेच भविष्यात या संदर्भात कोणतीही अडचण उद्भवल्यास त्याची सर्वस्व जबाबदारी विकसक आणि वास्तु विशारद यांची राहिल. तसेच या संदर्भात झोपुप्रा, पुणे कोणत्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

१०) प्रकल्पाअंतर्गत योजना क्षेत्रातील खुली जागा आणि सार्वजनिक रस्त्याअंतर्गत क्षेत्र सर्व रहिवाशांच्या सार्वजनिक वापराकरिता निरंतर उपलब्ध करून देणे बंधनकारक आहे.

[मा. मुख्य कार्यकारी अधिकारी,
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,पुणे यांच्या
दि.२६/०७/२०२३ रोजीच्या मान्यतेनुसार]

Slum Rehabilitation Authority
Technical Department
APPROVED
Pune-Pimpri-Chinchwad Area

प्र. सहाय्यक संचालक नगररचना
झो.पु.प्रा., पुणे.

प्रत :- १) मे. सम्यक गृहनिर्माण प्रा.लि.
१०१/१६, कर्वेरोड,
पुणे - ४११००४.

२) वास्तुविशारद श्री. राहुल माळवदकर
६७२/६७३, लोकेश सोसायटी, B समर्थ बिल्डींग,
कॅनरा बँक,बिबवेवाडी, पुणे.

३) तहसिलदार, ताबा विभाग, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना माहितीस्तव सादर.

४) संगणक अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे, यांना संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यासाठी अग्रेषित.